# SHIVAJI UNIVERSITY,
# KOLHAPUR.

ACCREDITED WITH GRADE A++ NAAC With CGPA 3.52

**Office of the Director – Internal Quality Assurance Cell (IQAC)**

**Website: www.unishivaji.ac.in, E-mail: iqac@unishivaji.ac.in, Contact No.: 0231-2609087**


No. SU/IQAC/School Connect (NEP Connect)/ 167 Date: /01/2024

15 JAN 2023

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी,
(माध्यमिक / उच्च माध्यमिक विभाग ),
हत्तीमहाल, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

**विषय :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषी विद्यापीठस्तरावरून स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान राबविण्याबाबत...

**संदर्भ :** १) उच्च व तंत्र विभागाचे दिनांक ०५.०१.२०२१ रोजीचे शासन निर्णय.
२) संदर्भ पत्र क्र. एसयु / अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष / १६३, दि. १०/०१/२०२४.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यात महाविद्यालयांतील स्थूल नोंदणी प्रमाण वाढविण्याचे अनुषंगाने व राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतूदीविषयी जनजागृती करण्याचे हेतूने, शिवाजी विद्यापीठाच्या वतीने इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता स्कुल कनेक्ट हे संपर्क अभियान विद्यापीठामार्फत, कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयांच्या परिक्षेत्रात राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या अभियानाअंतर्गत राज्यातील शासकीय, अनुदानित, विना अनुदानित व स्वयंअर्थसाहय्यित शाळा व कन्ष्ठि विद्यालयातील इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० नुसार होणारे बदल, विद्यापीठाने तयार केलेल्या बहुशाखीय लवचिक अभ्यासक्रम व उच्च शिक्षणातील महत्वपूर्ण योजना या सर्व विषयाची माहिती स्कुल कनेक्ट या अभियानामार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पाहेचविण्यात येणार आहे, हे संपर्क अभियान १५ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२४ या दरम्यान राबविण्यात येणार आहे.

सदर अभियान राबविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून प्रस्तुत विद्यापीठास यथायोग्य सहकार्य होणे अपेक्षित आहे. तरी, या संपर्क अभियानासाठी प्रत्येक कन्ष्ठि विद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यासाठी यथायोग्य व्यवस्था करण्याचे निर्देश द्यावेत. उपरोक्त अभियान राज्यातील सर्व शाळांमध्ये राबविण्यासाठी व लाभार्थी विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग नोंदविण्यासाठी मदत करावी. सोबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक ०५.०१.२०२४ रोजीचा शासन निर्णय जोडला आहे. तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून सहकार्य करावे, ही विनंती.

स्नेहांकित,

Deshmukh

**(प्रा. डॉ. एम. एस. देशमुख)**
संचालक, आय. क्यू. ए. सी.